पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – १२९**

(सभावृत्तांत)

**दिनांक – २४/०७/२०१९** **वेळ – दुपारी ०२.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची **साप्ताहिक** सभा बुधवार **दि.२४/०७/२०१९** रोजी दुपारी **०२.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१. **मा.मडिगेरी विलास हनुमंतराव – सभापती**
२. मा.गावडे राजेंद्र तानाजी
३. मा.आंगोळकर सागर सुनिल
४. मा.करुणा शेखर चिंचवडे
५. मा.खानोलकर प्रज्ञा महेश
६. मा.चोंधे आरती सुरेश
७. मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे
८. मा.लांडगे राजेंद्र किसनराव
९. मा.पंकज दत्तात्रय भालेकर
१०. मा.कलाटे मयूर पांडूरंग
११. मा.कलाटे राहुल तानाजी
१२. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

या शिवाय मा.श्रावण हर्डिकर – आयुक्त, मा.पाटील – अति.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.कुंभोजकर - मुख्य लेखापरिक्षक, मा.पाटील – प्र.शहर अभियंता, मा.पवार - उपसंचालक नगररचना, मा.कोळंबे - मुख्य लेखा अधिकारी, मा.डॉ.रॉय – आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.तुपे, मा.निकम – शह शहर अभियंता, मा.सवणे – प्र.सह शहर अभियंता, मा.चितळे, मा.आष्टीकर, मा.दुरगुडे, मा.इंदलकर, मा.लोणकर, मा.बोदडे - सहाय्यक आयुक्त, मा.राऊत, मा.दांगट – प्र.सहाय्यक आयुक्त, मा.साळुंके - मुख्य उद्यान अधिक्षक, मा.पाटील - प्राचार्य, औ.प्र.कैंद्र, मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (प्रथमिक शिक्षण), मा.मुंढे - प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक शिक्षण विभाग), मा.डॉ.साळवे – अति.आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.डॉ.वाबळे – अधिष्ठाता YCMH, मा.चव्हाण, मा.लडकत, मा.जुंधारे, मा.गलबले, मा.घोडे, मा.गट्टूवार, मा.पुजारी,

मा.पाटील, मा.घुबे, मा.पवार, मा.देशमुख, मा.फुटाणे, मा.राणे, मा.वाघुंडे, - कार्यकारी अभियंता, मा.डॉ.दगडे - पशुवैद्यकीय अधिकारी, मा.जगताप – कामगार कल्याण अधिकारी, मा.बहुरे – प्रशासन अधिकारी, मा.ऐवले – समाज विकास अधिकारी, मा.गोफणे – आरोग्य अधिकारी, मा.माने – लेखाधिकारी PMPML हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले –**

विषय क्र.३३) मनपाचे भोसरी सहल केंद्र उद्यान देखभाल व संरक्षण करणेबाबत. – मा.संतोष लोंढे, मा.करूणा चिंचवडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३४) मा.स्थायी समिती ठराव क्र.२८४० दि.२७/०६/२०१९ मध्ये दुरूस्ती करणेबाबत. - मा.आरती चोंधे, मा.राजेंद्र लांडगे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३५) प्रभाग क्र.२१ मधील आरक्षण क्र.१५९ (बेघरांसाठी घरे) हे आरक्षण विकसीत करणेकामी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) यांची नेमणूक करणेबाबत. – मा.करूणा चिंचवडे, मा.संतोष लोंढे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३६) भाटनगर हिंदू स्मशानभूमीचे नुतनीकरण करणेबाबत

विषय क्र.३७) औंध रावेत रस्त्यावरील साई चौक येथील पुलास बाधा करणारी अतिउच्चदाब (१३२ KV) विजवाहिनी हलविणेबाबत.

----------

**खालील प्रमाणे सुचना मांडणेत आली.**

सुचक – मा.पंकज भालेकर अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

सांगवीतील परिसरातील अडीच वर्षाच्या मुलीवर बालात्कार करून तिचा गळा दाबून ठार करणेत आलेने तिला सभेमध्ये श्रध्दांजली अर्पण करणेत यावी.

(सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.)

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली)

----------

**खालील प्रमाणे सुचना मांडणेत आली.**

सुचक – मा.राजेंद्र गावडे                                        अनुमोदक – मा.राहूल कलाटे

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाचे माहे एप्रिल ते जून अखेरच्या उत्पन्नाच्या तुलनेत सन २०१९-२० या आर्थिक वर्षाचे माहे एप्रिल ते जून अखेर भरीव वाढ झाल्याचे दिसून येत आहे. सदर उत्पन्नवाढीसाठी मा.सभापती, स्थायी समिती यांनी सदर कालावधीमध्ये विविध विभागांच्या बैठ्का घेऊन उत्पन्नवाढीसाठी काय उपाय योजना करता येतील याबाबत संबंधित शाखा प्रमुख यांचे बरोबर चर्चा करुन उत्पन्नवाढीसाठी प्रयत्न केल्याचे दिसून येत आहे. सदर बैठकांना मा.आयुक्त सो. यांनी देखील उपस्थित राहून अधिकारी व कर्मचारी यांना मोलाचे मार्गदर्शन केलेले असून सदर उत्पन्नवाढीमध्ये मा.आयुक्त यांच्या मार्गदर्शक सुचनांचा देखील मोलाचा वाटा आहे. तसेच उत्पन्नवाढीसाठी उपाय योजना करणेसाठी अधिकारी कर्मचारी यांना प्रोत्साहित केलेले आहे. त्यांच्या मार्गदर्शक सुचनांमुळे महानगरपालिकेच्या उत्पन्नात भरीव वाढ झालेली असल्यामुळे मा.स्थायी समितीच्या वतीने मा.आयुक्त यांचे अभिनंदन करणेत यावे.

(सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली)

मा.सभापती – सन्मा. सदस्यांचे सूचनेनुसार मा.श्री.श्रावण हर्डिकर - आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, यांचे सभागृहाच्या वतीने अभिनंदन करण्यात येत आहे.

----------

(मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.इंदलकर - प्र.कायदा सल्लागार, मा.तोडकर - मुख्य कोर्ट लिपिक यांनी लोक अदालतीचे अनुषंगाने विविध विभागांचे कामकाजात समन्वय ठेवून पाणीपट्टी व घरपट्टी थकबाकी वसुलीबाबत उल्लेखनीय काम करून मनपा उत्पन्नवाढीस हातभार लावलेबद्दल तसेच मा.फुटाणे - कार्यकारी अभियंता हे दि.३१/७/२०१९ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत असल्याने मा.स्थायी समितीच्या वतीने मा.सभापती, स्थायी समिती आणि मा.आयुक्त यांचे हस्ते शाल, श्रीफळ, गुलाब पुष्प व पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला.)

----------

अ) दिनांक ०३/०७/२०१९, दि.१०/०७/२०१९ दु.२.१५ वा. व दि.१२/०७/२०१९ दु.२.३० वा. झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्र.१२६)** चा सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ब) दिनांक १०/०७/२०१९ व दि.१२/०७/२०१९ दु.२.४५ वा झालेल्या सभेचा **(कार्यत्रिका क्र.१२७)** चा सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

क) दिनांक १७/०७/२०१९ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्र.१२८)** चा सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक - ५०६९ विषय क्रमांक – १
दिनांक – २४/०७/२०१९ विभाग – स्थापत्य फ मुख्यालय
सूचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.संतोष लोंढे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.स्था/नि/फ-मुख्य/२३४/१९ दि.०६/०७/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.92/03/2018-2019 अन्वये प्रभाग क्र.11 मधील पुर्णानगर येथील से.क्र.18 सी.डी.सी.मधील मोकळी जागा क्र.4 पर्यटन केंद्राच्या धर्तीवर विकसीत करणेकामी मे.बी.के.खोसे नि.र.रू.16,03,21,309/- (अक्षरी र.रु.सोळा कोटी तीन लाख एकवीस हजार तीनशे नऊ फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.15,76,40,392/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.15,76,40,392/- पेक्षा 6.75% कमी म्हणजेच र.रु.14,69,99,666/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.22,77,515/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.4,03,400/- = एकुण र.रु.14,96,80,581/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ५०७० विषय क्रमांक – २
दिनांक – २४/०७/२०१९ विभाग – मध्यवर्ती औषध भांडार
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.सागर आंगोळकर
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.मऔभां/१/कावि/१६२/१९ दि.०९/०७/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ८ रुग्णालये व २८ दवाखान्यांमधील बाह्यरुग्ण व आंतररुग्ण विभागातील रुग्णांकरिता ताप, अंगदुखी व डोकेदुखी करीता Tab. Paracetamol 500 mg

या गोळीचा वापर होतो. सदर गोळीचा साठा मध्यवर्ती औषध भांडारमध्ये शिल्लक नसल्याने व मनपाचे सर्व दवाखाने/रुग्णालयांना सदर औषधांचा तुटवडा निर्माण झाल्याने जुन्या निविदेनुसार पुरवठादार सदर औषधे पुरवठा करण्यास तयार नसल्याने व औषधे खरेदी संदर्भातील नविन निविदा क्र.१६/१/२०१८-२०२० नुसार पुरवठाधारक अंतिम निश्चित झाले नसल्याने व त्याच दरम्यान लोकसभेची आचारसंहिता लागु झालेने निवडणुक प्रक्रिया पार पाडणेकामी निवडणुक मतदान केंद्रावरही सदर गोळया उपलब्ध करुन देणे आवश्यक असल्याने तसेच ई-निविदा क्र.१६/१/२०१८-२० मधील सदर औषधांचे लघुत्तम निविदाधारक मे.शशी एंटरप्राईजेस, चिंचवड यांचेकडुन दि.१०/०४/२०१९ चे पुरवठा आदेशानुसार तातडीने Tab. Paracetamol 500mg र.रु.०.३४ + GST या प्रमाणे १०००००० गोळया र.रु.३,४०,०००/- (अक्षरी र.रू.तीन लाख चाळीस हजार फक्त) + GST थेट पध्दतीने खरेदी करण्यात आलेल्या आहेत. त्यापोटी आलेल्या र.रु.३,४०,०००/- + GST चे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ५०७१ विषय क्रमांक – ३

दिनांक – २४/०७/२०१९ विभाग – वाय.सी.एम.एच.

सूचक – मा.संतोष लोंढे अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.वायसीएमएच/८ड/कावि/३०७/१९ दि.११/०७/१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयातील नवीन पदव्युत्तर पदवी अभ्याक्रम सुरू करणेकरिता महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी दि.०१/०४/२०१७ चे पत्र क्र.मआविवि/पीबी/पीजी/कन्सेंट/४१८/ २०१७ दि.०१/०४/२०१७ अन्वये एकूण १० विषयांसाठी विद्यापीठ संलग्नीकरण संमतीपत्र (Condent of Affiliation) शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करिता देण्यात आले आहे त्यानुसार विद्यापीठ शैक्षणिक अधिसुचना क्रमांक ४२/२०१७ मधील मुद्दा क्रमांक ११ नुसार एम.डी.रेडीओ डायग्नोसीस, एम.एस. जनरल सर्जरी व एम.डी.जनरल मेडीसीन या ०३ विषयात विद्यापीठ संलग्नीकरण संमतीपत्राची पुर्नवैधता सन २०१९-२०२०, २०२०-२०२१, २०२१-२०२२ करीता करून घ्यावयाची असल्याने सदर प्रती विषयाकरीता र.रू.१,००,०००/- (अक्षरी र.रू.एक लाख फक्त) प्रमाणे एकुण ०३ विषयाकरीता तीन वर्षासाठी र.रू.९,००,०००/- (अक्षरी र.रू.नऊ लाख फक्त) आदेश क्र.वायसीएमएच/८ड/कावि/१७९/२०१९, दिनांक १५/०३/२०१९ रोजी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांना अदा करणेस मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सदरची रक्कम महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांना दिनांक १८/०३/२०१९ रोजी RTGS द्वारे अदा करणेत आलेली आहे. सबब, उपरोक्तकामी ३ विषयांचे तीन वर्षासाठी र.रू.९,००,०००/-(अक्षरी र.रू. नऊ लाख फक्त) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांना

देणेकामी यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयाकडील पी.सी.एम.सी (वायसीएमएच) एम.यु.एच.एस. पी.जी. इन्स्टिट्युट या लेखाशिर्षातुन व सन २०१८-२०१९ च्या सुधारीत अंदाजपत्रकानुसार र.रू.८,००,०००,००/-मधुन खर्ची टाकण्यात आलेला असुन त्यास कार्योत्तर मान्यता देणेतयेत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ५०७२ | विषय क्रमांक – ४

दिनांक – २४/०७/२०१९ | विभाग – वाय.सी.एम.एच.

सूचक – मा.सागर आंगोळकर | अनुमोदक – मा.आरती चोंधे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.वायसीएमएच/७/कावि/४०७/१९ दि.११/०७/१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालयाकरीता दरमहा एकत्रित मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात विविध कन्सलटंट पदे सहा महिने कालावधीकरीता भरणेकामी जाहिरात प्रसिध्द करून प्राप्त उमेदवारांच्या मुलाखती घेऊन पात्र उमेदवारांना आदेश क्र. वायसीएमएच/७/कावि/५५८/२०१८ दि.२९/११/२०१८ अन्वये व वेळोवेळी Walk In Interview व्दारे निवड झालेल्या उमेदवारांना तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती देणेत आलेली आहे. नियुक्ती दिलेल्या उमेदवारांचा नियुक्ती कालावधी दि.२८/०५/२०१९ रोजी संपुष्टांत आला असल्याने माहे मे २०१९ अखेर कार्यरत असलेल्या आवश्यक ११ विविध पदावरील उमेदवारांना आदेश क्र.वायसीएमएच/७/कावि/२६३/२०१९ दि.२१/०५/२०१९ अन्वये पुढील तीन महिने कालावधीसाठी मुदतवाढ दिलेली आहे. परंतु जी पदे पुर्ण क्षमतेने भरली गेली नाहीत अशी रिक्त जागेकरीता दि.१७/०६/२०१९ व दि.२४/०६/२०१९ रोजी Walk In Interview घेण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये खालील उमेदवाराची नियुक्ती करणेत आलेली असून त्याचा तपशील पुढील प्रमाणे-

| अ.क्र | उमेदवारांचे नाव | शैक्षणिक अर्हता | पदनाम | प्रवर्ग व निवड | मानधन प्र.महिना |
|---|---|---|---|---|---|
| १ | डॉ. प्रतिक्षा प्रकाश कातोरे | एम.बी.बी.एस | वैद्यकिय अधिकारी आय.सी.यु | खुला | ४५०००/- |
| २ | डॉ. निमिशा मोनी इनोसे | एम.बी.बी.एस | वैद्यकिय अधिकारी आय.सी.यु | खुला | ४५०००/- |

वरील प्रमाणे निवड झालेल्या उमेदवारांना एकत्रित मानधनावर आदेशाच्या तारखेपासून दिनांक ०८/०७/२०१९ ते दि.२८/०८/२०१९ अखेर नेमणुक देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ५०७३ विषय क्रमांक – ५

दिनांक – २४/०७/२०१९ विभाग – पाणीपुरवठा, ब क्षेत्रीय

सूचक – मा.करूणा चिंचवडे अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.पापु/बक्षेका/२/कावि/८९/१९ दि.१५/०७/१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

"पवना धरणापासून से.क्र.२३ जलशुद्धीकरण केंद्र निगडी पर्यंत पाणी आणणेसाठी थेट पाईपलाईन टाकणे" या कामाचा आदेश मे.एनसीसी-एसएमसी- इंदू (जेव्ही) यांना दि.३०/०४/२००८ रोजी देणेत आला आहे. दि.०९/०८/२०११ रोजी मुंबई–पुणे द्रुतगती मार्गावर बऊर येथे या प्रकल्पा विरोधात झालेल्या रस्ता रोकोच्या आंदोलन प्रसंगी पोलीस गोळीबारात ३ शेतक-यांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने दि.१०/०८/२०११ पासून मा.जिल्हादंडाधिकारी, पुणे यांचे आदेशानुसार जिल्ह्याची कायदा व सुव्यवस्था परिस्थिती अबाधित ठेवण्यासाठी सदरचे काम बंद करणेत आले. सद्यस्थितीत, सदरचे काम पुन:श्च चालू करणेकरीता राज्यशासनाकडे पाठपुरावा चालू आहे. दि.२५/०३/२०१९ रोजीच्या पत्रान्वये ठेकेदाराने कामाचे Termination करणेबाबत नोटीस दिलेली आहे. कार्यकारी अभियंता, द्वार निर्मिती विभाग अ दापोडी, पुणे १२ यांचेकडील पत्र क्र.द्वा.नि.वि. अ/तां.शा/१२१३/सन २०१९ दि.२९/०५/२०१९ अन्वये साईटवर असलेले पाईप्स चिखली येथील नियोजित जलशुद्धीकरण केंद्राच्या आवारात स्थलांतरीत करणेबाबत या विभागाकडून कळविणेत आलेले आहे. परंतू सदर ठिकाणी सामाजिक वनीकरण झाले असलेने पाईप्सचे स्थलांतर चिखली या ठिकाणी करणे शक्य होणार नाही. सद्यस्थितीत मौजे रावेत, स.नं.१७७ पै. येथे सरकारी गायरान असून त्याचे क्षेत्रफळ अंदाजे ७ ते ८ हेक्टर एवढे आहे. परंतू सदरचे गायरान मनपाच्या ताब्यात नाही. तरी त्यासाठी जिल्हाधिकारी, पुणे यांचे पाईप्स ठेवणेसाठी परवानगी घ्यावी लागणार आहे. कार्यकारी अभियंता, द्वार निर्मिती विभाग अ दापोडी, पुणे १२ यांचेकडील पत्र क्र.द्वा.नि.वि. अ/तां.शा/१२१३/सन २०१९ दि.२९/०५/२०१९ पत्रान्वये पाईप्स स्थलांतरीत करणेसाठी ८० लाखांचा निधी आगाऊ प्राप्त करुन देणेबाबत कळविले आहे. तरी त्याबाबत कार्यकारी अभियंता, द्वार निर्मिती विभाग 'अ' दापोडी, पुणे– १२ यांचे नावे ८० लाखाचा निधी जमा करावा लागणार आहे. तरी त्या अनुषंगाने 'पवना धरणा पासून से.क्र.२३ जलशुद्धीकरण केंद्र निगडी पर्यंत पाणी आणणेसाठी थेट पाईपलाईन टाकणे' या कामातील मावळ तालुक्यातील कामशेत, कान्हेफाटा, बो-हाडे वस्ती वडगाव मावळ, ब्राम्हणवाडी, किवळे आणि गहुंजे इ. भागात असलेले पाईप्स पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात स्थलांतरीत करणेसाठी र.रु.८० लक्ष चा निधी कार्यकारी अभियंता, द्वार निर्मिती विभाग 'अ' दापोडी, पुणे–१२ यांचे नावे जमा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ५०७४ विषय क्रमांक – ६
दिनांक – २४/०७/२०१९ विभाग – विद्युत, ग क्षेत्रीय
सूचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.झामाबाई बारणे
संदर्भ – मा.सह शहर अभियंता(वि/यां) यांचे कडील पत्र क्र.वि/गक्षे/थेर/३/९९/१९ दि.१५/०७/१९

मा.सह शहर अभियंता(वि/यां) यांनी शिफारस केले प्रमाणे –

प्रभाग क्र.४९ थेरगाव बापुजीबुवा नगर येथील सर्व्हे नं.९ मध्ये दवाखाना या इमारतीचे बांधकाम (२०० बेड साठी) चालु आहे. सदर इमारतीत उच्चदाब वीज पुरवठा करणेकामी म.रा.वि.वि.कंपनीस विहीत नमुन्यात अर्ज सादर केला असता, म.रा.वि.वि.कंपनीचे मंजुर अंदाजपत्रक क्र.SE/GKUC/T/HT/New/DDF-1.3%/PIMPRI/19-20/33/3076, दि.20/06/2019 अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस अनामत सह वीज पर्यवेक्षण शुल्क र.रु.८४,६४,५११/- (अक्षरी र.रू.चौ-याऐंशी लाख चौसष्ठ हजार पाचशे अकरा फक्त) अदा करणेबाबत कळवले आहे. सदरची रक्कम मनपाने म.रा.वि.वि. कंपनीस अदा केल्यानंतर त्यांच्या कडुन उच्चदाब विज पुरवठा करण्यात येणार असल्याने, सदरची रक्कम अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ५०७५ विषय क्रमांक – ७
दिनांक – २४/०७/२०१९ विभाग – फ क्षेत्रीय
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.आरती चोंधे
संदर्भ – मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे कडील पत्र क्र.फक्षेका/नि-४/कावि/१४९/२०१९ दि.१५/०७/१९

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या फ क्षेत्रिय कार्यालयाकडील विद्युत विभागाचे निविदा कामांच्या सोबतचे प्रपत्र 'अ' मधील (1 ते 12) नियमानुसार व निविदा अटी-शर्ती प्रमाणे लघुत्तम दराच्या निविदा स्विकारणेत आलेल्या असुन मंजुर दराने ठेकेदारास निविदा करारनामा करून कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ५०७६ विषय क्रमांक – ८
दिनांक – २४/०७/२०१९ विभाग – स्थापत्य क मुख्यालय
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे
संदर्भ – मा.अति.आयुक्त यांचे कडील पत्र क्र.स्था/नि/क-मुख्य/२४८/२०१९ दि.१५/०७/१९

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.99/4/2018-19 अन्वये प्रभाग क्र.२ चिखली मधील से.नं.१६ राजेशिवाजी नगर मध्ये फुटपाथ विकसीत करणेकामी मे.आर.एम.एन्टरप्रायझेस

नि.र.रू.1,12,53,424/- (अक्षरी र.रु.एक कोटी बारा लाख त्रेपन्न हजार चारशे चोवीस फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.1,09,09,201/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.1,09,09,201/- पेक्षा 29.30% कमी म्हणजेच र.रु.77,12,805/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.55,248/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.2,88,975/- = एकुण र.रु.80,57,028/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ५०७७ विषय क्रमांक – ९

दिनांक – २४/०७/२०१९ विभाग – स्थापत्य BRTS

सूचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.संतोष लोंढे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.स्था/BRTS/६३४/२०१९ दि.१६/०७/१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विकास आराखड्यामध्ये सुमारे ३०.०० कि.मी. लांबीचा व ३०.०० मी. रुंदीचा उच्चक्षमता द्रुतगती मार्ग आहे. या मार्गाचा काही भाग महानगरपालिकेच्या अखत्यारीत येत असुन त्यापैकी सुमारे ६५% जागा मनपाचे ताब्यात आहे. या मार्गाचा रहाटणी, काळेवाडी, थेरगांव मधील काही भाग पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधकिरणाचे अखत्यारीत येत असुन त्यापैकी सुमारे ५०% जागा ताब्यात आहे व उर्वरीत ५०% भागावर अतिक्रमण आहे. उपरोक्त नमुद उच्चक्षमता द्रुतगती मार्गाचे नियोजन व विकास करणेकामी महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन यांनी पूर्व व्यवहार्यता अहवाल (Pre Feasibaility Report) तयार केला आहे. सदर रस्त्याचे नियोजन व विकास करणे बाबत धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे. त्याबाबतचे सादरीकरण मा.महापौर, मा.उपमहापौर, मा.सभापती, स्थायी समिती, मा.सत्तारुढ पक्षनेता, मा.विरोधी पक्षनेता तसेच सर्व सन्मानीय पदाधिकारी व गटनेते यांचे करीता दि.२८/०६/२०१९ दु.४.३० वाजता आयोजित केले होते. कार्यकारी निर्देशक, महामेट्रो यांनी त्यांचे पत्र क्र.Maha-metro/Pune/Civil/16 दि.१८/०६/२०१९ अन्वये सदर कामाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे कामी खालील प्रमाणे फी आकारणेत येईल असे कळविले आहे.

1. अल्टरनेट अॅनालिसिस रिपोर्ट- ५० लाख + GST
2. डीटेल्ड प्रोजेक्ट रिपोर्ट – १५ लाख प्रति कि.मी. + GST

या विभागाकडील पत्र क्र.Civil/BRTS/611/2019 दि.०८/०७/२०१९ अन्वये महामेट्रो यांना दर कमी करणेसाठी विचारणा केली असता महामेट्रो यांचे कडुन दि.१५/०७/२०१९ रोजीचे प्राप्त ई-मेल द्वारे कळविले नुसार यापूर्वीचे पत्र क्र.Maha-Metro/Pune/Civil/16 दि.१८/०६/२०१९

अन्वये कळविलेले दर कायम ठेवलेले आहेत. ई-मेल मध्ये नमुद केले नुसार ठाणे व नाशिक शहरांसाठीच्या अशा प्रकारच्या प्रकल्पांसाठी उपरोक्त नमुद दराप्रमाणेच दर आहेत असे निदर्शनास येते. सदर कामांचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेकामी महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन लि. यांची प्रकल्प सल्लागार म्हणुन नेमणुक करणे व महामेट्रो यांनी दिलेल्या दरास मान्यता देणेत येत आहे.

अनुकुल – ११ प्रतिकुल – ०१

सदर ठराव बहुमताने मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ५०७८ विषय क्रमांक – १०

दिनांक – २४/०७/२०१९ विभाग – स्थापत्य ह मुख्यालय

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.अति. आयुक्त यांचे कडील पत्र क्र.स्था/नि/क-मुख्य/२५०/२०१९ दि.१६/०७/१९

विषय – कासारवाडी जलतरण तलावास संरक्षण भिंत बांधणे व रस्ता विकसित करणेबाबत.

विषय क्र.१० चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ५०७९ विषय क्रमांक – ११

दिनांक – २४/०७/२०१९ विभाग – स्थापत्य क मुख्यालय

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.अति. आयुक्त यांचे कडील पत्र क्र.स्था/नि/क-मुख्य/२४९/२०१९ दि.१६/०७/१९

मा.अति. आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.88/2/2018-19 अन्वये प्रभाग क्र.६ धावडेवस्ती, भगतवस्ती, गुळवेवस्ती परिसरामध्ये स्टॉर्म वॉटर लाईन टाकणेकामी मे.वैदेही कन्स्ट्रक्शन नि.र.रू.62,55,254/- (अक्षरी र.रु.बासष्ठ लाख पंचावन्न हजार दोनशे चोपन्न फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.62,07,936/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.62,07,936/- पेक्षा 19.21% कमी म्हणजेच र.रु.50,15,391/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.29,650/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.17,668/- = एकुण र.रु.50,62,709/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ५०८०	विषय क्रमांक – १२
दिनांक – २४/०७/२०१९	विभाग – मध्यवर्ती औषध भांडार
सूचक – मा.करूणा चिंचवडे	अनुमोदक – मा.झामाबाई बारणे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.मऔभां/१/कावि/१७३/२०१९ दि.१६/०७/१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मे.पायल फार्मा यांना देणेत आलेल्या पुरवठा आदेशातील Injection सोबतचे water for injection २७००० Amp खरेदीकामी आलेल्या र.रु.२८,०८०/- (अक्षरी र.रू.अठ्ठावीस हजार ऐंशी फक्त) चे खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ५(२)(२) नुसार कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ५०८१	विषय क्रमांक – १३
दिनांक – २४/०७/२०१९	विभाग – मध्यवर्ती औषध भांडार
सूचक – मा.सागर आंगोळकर	अनुमोदक – मा.आरती चोंधे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.मऔभां/१/कावि/१७४/२०१९ दि.१६/०७/१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरलिकेच्या दवाखाने/ रुग्णालयांमध्ये श्वान दंश झालेल्या रूग्णांवर वैद्यकिय उपचार केले जातात. श्वानदंश झालेल्या रुग्णांचे उपचाराकरीता Inj. Anti Rabies I/M,I/D ची आवश्यकता असते. सदर औषधांच्या खरेदीकामी निश्चित केलेल्या एजंन्सीची मुदत संपूष्टात आल्याने व नविन निविदा कार्यवाही पुर्ण झाली नसलेने तसेच सर्व रूग्णालये/दवाखाने यांचेकडुन सदर इंजेक्शनची मागणी होत असल्याने रूग्णांच्या वैद्यकिय उपचाराकरीता सदर इंजेक्शनची खरेदी करण्यात आली असून याकामी झालेल्या र.रू.८८,४८५/- (अक्षरी र.रू.आठ्ठयाऐंशी हजार चारशे पंच्याऐंशी फक्त) चे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ५०८२	विषय क्रमांक – १४
दिनांक – २४/०७/२०१९	विभाग – मध्यवर्ती औषध भांडार
सूचक – मा.संतोष लोंढे	अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.मऔभां/१/कावि/१७५/२०१९ दि.१६/०७/१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरलिकेच्या रुग्णालयांमध्ये स्त्रीरोग विभागाकरीता Inj Oxytocin या औषधाची आवश्यकता असते. नविन निविदा क्र.१६/१/२०१८-२० अंतिम करण्याची कार्यवाही चालु आहे. परंतु या औषधाची आवश्यकता असलेने सदर निविदेतील Inj Oxytocin साठी Keps Pharma, Mumbai यांचेकडुन लघुत्तम दर र.रु.८.१३+GST इतका प्राप्त झालेला आहे. Keps Pharma,

Mumbai यांना विचारणा केली असता, त्यांनी पुरवठा करणेची तयारी दर्शविलेली असल्याने त्यांना रुग्णालयाकडील स्त्रीरोग विभागाकरीताची तातडीक मागणी विचारात घेता निविदा क्र.१६/१/२०१८-२० अन्वये प्राप्त झालेले दरानुसार Keps Pharma, Mumbai यांना थेट पध्दतीने Inj Oxytocin २०००० Amp चा पुरवठा आदेश निर्गत करण्यात आलेला आहे. त्याकामी येणारा खर्च र.रु.१,६२,६००/- (अक्षरी र.रू.एक लाख बासष्ठ हजार सहाशे फक्त) + GST चे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ५०८३ विषय क्रमांक – १५

दिनांक – २४/०७/२०१९ विभाग – वैद्यकिय मुख्य कार्यालय

सूचक – मा.करूणा चिंचवडे अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.वैद्य/१७/कावि/३१६/२०१९ दि.१७/०७/१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

१.वैद्यकिय विभागांतर्गत मानधनावर कार्यरत असणा-या व न्यायालयामध्ये दावा दाखल केलेल्या कर्मचा-यांना कुशल कामगार/ अकुशल कामगार वर्गवारी नुसार दि.०१-०४-२०१८ पासुन खालील प्रमाणे नमूद तक्त्यानुसार किमान वेतन दरांनुसार मानधन अदा करणेस व त्याकरीता येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

२.त्याच प्रमाणे सद्यस्थितीत मानधन स्वरुपात कार्यरत असणा-या सर्व कर्मचा-यांना देखील प्रचलित किमान वेतन दरांनुसार मानधन लागू करणे व याकरीता येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | पदनाम | किमान वेतनानुसार मानधन | | |
|---|---|---|---|---|
| कुशल कामगार | | ०१-०४-२०१८ पासुन | ०१-०७-२०१८ पासुन | ०१-०१-२०१९ पासुन |
| १ | फार्मासिस्ट | २०,८४९/- | २०,९७४/- | २१,७२४/- |
| २ | स्टाफनर्स | २०,८४९/- | २०,९७४/- | २१,७२४/- |
| ३ | लॅब टेक्निशियन | २०,८४९/- | २०,९७४/- | २१,७२४/- |
| ४ | ई.सी.जी. टेक्निशियन | २०,८४९/- | २०,९७४/- | २१,७२४/- |
| ५ | नेत्र चिकित्सा अधिकारी | २०,८४९/- | २०,९७४/- | २१,७२४/- |
| ६ | एक्स रे टेक्निशियन | २०,८४९/- | २०,९७४/- | २१,७२४/- |
| ७ | फिजिओथेरपिस्ट | २०,८४९/- | २०,९७४/- | २१,७२४/- |
| अकुशल कामगार | | | | |
| ८ | पुरुष कक्ष मदतनीस | १७,८७१/- | १७,९९६/- | १८,७४६/- |
| ९ | सफाई सेवक (महिला) | १७,८७१/- | १७,९९६/- | १८,७४६/- |

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ५०८४ विषय क्रमांक – १६
दिनांक – २४/०७/२०१९ विभाग – ब क्षेत्रीय
सूचक – मा.आरती चोंधे अनुमोदक – मा.सागर आंगोळकर
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.बक्षेका/४/कावि/२३४/२०१९ दि.१७/०७/१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

क्षेत्रीय अधिकारी यांनी ११ महिने कालावधीकरिता फक्त भाजी मंडई, व्यापारी गाळे, वाहनतळ, उपहारगृह, सांस्कृतिक हॉल, विरंगुळा केंद्र, मैदान इत्यादीचे मा.आयुक्त सो. यांचेकडील परिपत्रक क्र.भूजि/१/कावि/१५६/२०१३ दि.२०/४/२०१३ अन्वये थेट पध्दतीने वितरीत करणेकामी निर्देश दिले आहेत. किवळे येथील मुकाई चौक रावेत बस टर्मिनस मधील गाळाभाडे तत्वावर मिळणेकामी श्री निलेश बाळासाहेब म्होहकर यांना देणे बाबत मा.श्री मोरेश्वर महादु भोंडवे यांनी शिफारस केली आहे.त्यानुसार सहा.आयुक्त भुमि आणि जिंदगी विभाग यांनी सदर ठिकाणचा गाळा क्रमांक ७ रिक्त असल्याने तो ११ महिने कालावधीकरीता भाडे तत्वावर देणेबाबत कळविले आहे. उपसंचालक, नगररचना व विकास विभाग यांनी सन २०१८-२०१९ करीता प्रतिमहा भाडे दर र.रु.४८.०० प्रती चौ.फुट असे दिले आहे सन २०१९-२०१० करीता या मध्ये १२.५% वाढ करुन ११ महिन्यांचे गाळयाचे भाडे र.रु.४०,३२६/-, GST(१८%) र.रु.७,२६०/- व चार महिन्यांचे भाडे रक्कम अनामत र.रु.१४,६६४/- असे एकूण र.रु.६२,२५०/- मा.स्थायी समितीची मान्यता मिळालेनंतर भरुन घेण्यात येईल. किवळे येथील मुकाई चौक रावेत बस टर्मिनस मधील गाळा क्रमांक ७ हा श्री निलेश बाळासाहेब म्होहकर यांच्याशी करारनामा करुन ११ महीने कालावधीसाठी भाडे तत्वावर देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ५०८५ विषय क्रमांक – १७
दिनांक – २४/०७/२०१९ विभाग – नगररचना व विकास
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.नरवि/कावि/१६/४४६/२०१९ दि.१०/०७/१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण क्षेत्रातील मौजे बो-हाडेवाडी येथील पेठ क्र.१४, खुली जागा क्र.१ भूखंडामधील मोकळी जागा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस सार्वजनिक प्रयोजनासाठी हस्तांतरीत करणेसाठी र.रु.१/- (अक्षरी र.रू. एक फक्त) या नाममात्र दराचे भूखंडाचे अधिमुल्याच्या खर्चास तसेच भाडेपट्टा करार नोंदविण्याकामी अपेक्षित सर्व अनुषंगिक खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ५०८६ विषय क्रमांक – १८

दिनांक – २४/०७/२०१९ विभाग – लेखा

सूचक – मा.संतोष लोंढे अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.लेखा/०३/कावि/१७७/२०१९ दि.१७/०७/१९

विषय – पीएमपीएमएल संस्थेस संचलनतुट व विविध प्रकारचे पासेस पोटी दर महा रक्कम अदा करणेबाबत.

विषय क्र.१८ चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ५०८७ विषय क्रमांक – १९

दिनांक – २४/०७/२०१९ विभाग – नगररचना व विकास

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.नरवि/कावि/०८/२०८/२०१९ दि.१७/०७/१९

विषय – मौजे रावेत येथील महामंडळाच्या हद्दीतील जागा रस्त्याकरिता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ताब्यात घेणेबाबत.

विषय क्र.१९ चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ५०८८ विषय क्रमांक – २०

दिनांक – २४/०७/२०१९ विभाग – स्थापत्य अ मुख्यालय

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.झामाबाई बारणे

संदर्भ – मा.अति. आयुक्त यांचे कडील पत्र क्र.स्था/नि/अ-मुख्य/२५९/२०१९ दि.१७/०७/१९

मा.अति. आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.101/02/2018-19 अन्वये प्रभाग क्र.१० सायन्स पार्क तारांगण (टप्पा २) येथे उर्वरीत कामे करणेकामी मे.देव कन्स्ट्रक्शन नि.र.रू.2,72,42,886/- (अक्षरी र.रु.दोन कोटी बहात्तर लाख बेचाळीस हजार आठशे शहाऐंशी फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.2,71,64,979/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.2,71,64,979/- पेक्षा 16.51% कमी म्हणजेच र.रु.2,26,80,041/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.12,647/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.65,260/- = एकुण र.रु.2,27,57,948/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ५०८९ विषय क्रमांक – २१

दिनांक – २४/०७/२०१९ विभाग – वाय.सी.एम.एच.

सूचक – मा.संतोष लोंढे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.वायसीयएमएच/७/कावि/४११/२०१९ दि.१५/०५/१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाचे यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयामधील दरमहा एकत्रीत मानधनावर तात्पुरत्या स्वरूपात सहा महिनेकरीता नेमणुक केलेल्या पाच वैद्यकिय अधिकारी सीएमओ पदावरील उमेदवारांची मुदत दि.०२/०५/२०१९ रोजी संपुष्टात येत आहे. सध्यस्थितीत लोकसभा निवडणुक २०१९ ची आचारसंहिता कालावधी लागू असून नव्याने जाहिरात प्रकटन प्रसिध्द करून भरती प्रक्रिया राबविणे शक्य नसल्याने सध्यस्थितीत कार्यरत असलेल्या पाच वैद्यकिय अधिकारी सी.एम.ओ पदावरील उमेदवारांना पुढील कालावधीसाठी मुदतवाढ देणेस कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ५०९० विषय क्रमांक – २२

दिनांक – २४/०७/२०१९ विभाग – स्थापत्य क मुख्यालय

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.आरती चोंधे

संदर्भ – मा.अति. आयुक्त यांचे कडील पत्र क्र.स्था/नि/क-मुख्य/२५३/२०१९ दि.१८/०७/१९

मा.अति. आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

